# "REWRITTING & REVIVAL OF THE HISTORY"



Edited By
Mrs. S.S. Ghumare
Prof. V. M. Pawar
Prof. C.B.Bhoj

**KUSUMAGRAJ PRAKASHAN**
GAIDHANI NIWAS, GHANKAR LANE, NASHIK - 422001.
MOBILE : 9422943652

# CONTENTS


| Sr. | Theme of the Paper | Author |
|---|---|---|
| १) | Need for Rewriting History | Dr. S. Chandni Bi |
| २) | " इतिहास पुर्नलेखन व पुनरावलोकन : एक विचार " | प्रा. डॉ. आर. पी. भामरे |
| ३) | मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे पुर्नलेखन | प्रा.रामदास भोंग, कु.मेघा बारगळ |
| ४) | अंकाई येथील जैन लेणी | प्रा. जाधव नितीन साहेबराव |
| ५) | प्राचीन काळातील इतिहासलेखन प्रवाह | प्रा. विजय कारभारी चव्हाण |
| ६) | सबाल्टर्न इतिहास लेखन | प्रा. श्रीमती भोज छाया भास्कर |
| ७) | भारतातील वंचीत समुह चळवळीचा इतिहास | प्रा.आर.डी.आगवाने. |
| ८) | इतिहास पुनर्लेखनाची गरज | प्रा. जे. डी. गोपाळ |
| ९). | इतिहास पुनर्लेखनाची गरज | प्रा. सौ. मंगला निकुंभ |
| १०) | भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन | प्रा. उषा पोपटराव गायकर |
| ११) | इतिहासाच्या पूनर्लेखनाची आवश्यकता | डॉ. एस.डी.खैरनार |
| १२) | इतिहासातील राष्ट्रवादी दृष्टीकोण आणि आदिवासींचा इतिहास | प्रा. चंद्रप्रकाश गंगाराम कांबळे. |
| १३) | इतिहासालेखनातील प्रमुख प्रवाह | प्रा. सानप मालती अशोक |
| १४) | It is essential of Rewritting of History | Prof. V.M.Pawar |
| १५) | इतिहास पुनर्लेखनाची आवश्यकता | श्रीमती इंदिरा लोखंडे<br>डॉ. के. डी. ढेकणे |
| १६) | LOKMANYA TILAK: AS A JOURNALIST | Mrs. Pragati B. Marakwar |
| १७) | "स्थानिक इतिहास पुर्नलेखनाची : आवश्यकता" | बोडके एस. डी. |
| १८) | राजषी शाहू महाराज.... ब्राह्मणी प्रसार माध्यमांचा ब्राह्मणेतर प्रसार माध्यमांवरील प्रभाव व समाजात पसरत चाललेल्या चुकीचा इतिहास | प्रा. संजय तुळशिराम शेलार |
| १९) | जमातवादी इतिहास लेखनाचे आव्हान | अजय एकनाथ अहिर |
| २०) | "भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन ही बदलत्या काळाजी गरज आहे" | श्री. शिंदे नारायण अंबु |
| २१) | हिंदवी स्वराजातील बागलाणचे लष्करी महत्व | प्रा. भामरे एस. टी. |
| २२) | Deconstruction: re-writing and re-reading text from the Historical Perspective | Prof. Subhash Laxman Ahire |
| २३) | राजश्री छत्रपती शाहू महाराज | शिंदे प्रतिक्षा सोमनाथ |
| २४) | सावित्रीबाई फुले | सानप लक्ष्मी केशव |
| २५) | इतिहासाचे पुर्नलेखन व पनरावलोकन आद्यक्रांतिकारक नरवीर उमाजी नाईक | गोसावी अमोल संजयगिरी |
| २६) | इतिहासाचे पुनरलेखन व पुनरअवलोकन | गोडे रामेश्वर बाजीराव |
| २७) | इतिहासाचे पुर्नलेखन व पुनरावलोकन | पोटे सोनाली शंकर |
| २८) | इतिहास पुर्णलेखनाची गरज | सुजाता दत्तात्रेय पोटे |

# प्राचीन काळातील इतिहासलेखन प्रवाह

प्रा. विजय कारभारी चव्हाण
कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
ओझर (मिग) ता. निफाड, जि. नाशिक

- **प्रास्ताविक :-** भारतीय इतिहास लेखन हे प्राचीन काळात कसे विकसित होत गेले. त्याचा आढावा घेत असताना भारतीय इतिहासासंबधी वेगवेगळे विचार मांडले गेले आहेत. भारतीय इतिहारस लेखनाचा आवाका मोठा असून त्याचे रहस्य समजुन घेणे आवश्यक आहे. वेगवेगळया काळात इतिहासाला उपयुक्त ठरेल अशा स्वरूपाचे विपुल असे साहित्य त्या काळात निर्माण झाले होते. भारतीय इतिहासलेखन हे प्रामुख्याने वैदिक काळापासून तो आधुनिक काळापर्यंत पाहावयास मिळते. मात्र हे लिखान असंघटित स्वरूपात आहे त्याची सुसंगती लावावी लागते. डॉ. मुजूमदार यांच्या मते प्राचीन भारतात काही प्रमाणात इतिहासलेखन झाले पण त्याचा दर्जा मात्र हा उपरिपक्व स्वरूपाचा होता. तत्वज्ञान, नाय्यशास्त्र, व्याकरणशास्त्र, ज्योतिषशास्त्र, वैद्यकशास्त्र, कला वास्तुकला, यांच्या जोरावर इतिहासकार इतिहास लेखन करू शकतो.
- उद्दीष्टे (हेतु)
  १) प्राचीन काळातील इतिहास लेखन शास्त्राचा आढावा.
  २) प्राचीन ग्रंथाचा थोडक्यात आढावा.
  ३) भारतीय प्राचीन कालखंडात इतिहासाकडे बघण्याचा दृष्टीकोन
  ४) इतिहास लेखनातील मर्यादा.

**१) प्राचीन काळातील इतिहास लेखन शास्त्राचा आढवा :-**

भारतीयांनी इतिहासाबद्दल विविध दृष्टिकोन मांडले आहेत. काळाबद्दल मत मांडायचे तर ते चार युग त्यात कृत, त्रेत, द्वापार, कली, ही महत्त्वाची मानवी आहेत. यात प्रत्येक युगात होणारे बद्दल व त्याचे परिणाम दिले असून शेवटी जगाचा विनाश सांगण्यात आला आहे. हिंदूच्या इतिहास कप्लनेत आश्रमधर्म संस्कार यांचा समावेश आहे. व्यक्तीच्या जन्मापासुन मृत्यूपर्यंत मानवी आयुष्याचा काळाचा हिशोब चार टप्प्यात मांडण्यात आला आहे. यात ब्रम्हाचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, सन्यांस, यांचा समावेश असुन समाजाने कसे रहावे हे या आश्रम पध्दतीचे वैशिष्टे आहे. संस्कार म्हणजे जीवन संपन्न अवस्थेत जगण्याचा मलमंत्र होय. यावरच विशिष्ट चालीरीती, परिस्थिती आपणास बघावयास मिळते. यात संस्काराची संख्या १६ असुन त्यात गर्भधान, पुंसवानी, सिमतोन्नयत्त, जातकर्म, नामकरण, निष्क्रमण, अन्नप्राशन, चुडाकर्ण, कर्णवेध, उपनयन, मेथाजनन, गोदान, सभावर्तन, विवाह, अग्निपरिगृह, अंत्येष्टी, असुन या लेखनाच्या आधारावर समाज रचना प्राचीन काळी होती. तसेच या काळातील लेखनकलेचा अंदाज आपणास येतो.

२) प्रचीन ग्रंथाचा आढावा :-

- **पुराणे :-** प्राचीन भारताचया इतिहासात पुराणानां फार महत्त्व असुन त्याचाइतिहासाची साधने म्हणुन आजही उपयोग केला जातो. त्याचामुळकाळ इ.स.पू. पाचव्या शतकापर्यंत जातो. पुराणांची संख्या १८ मानली जाते तेवढीच उपपुराणांची संख्या मानली जाते. त्यात ब्रम्ह, पदम, विष्णू, भागवत, नारदवायू, मार्कंडेय, अग्नी, भविष्य, ब्रम्हवैवर्ण, लिंग, वराह, स्कंद, वामन, कूर्म, मत्स्य, गरूड, वायू, ब्रम्हांड पुराणामध्ये दिलेली माहिती सलग स्वरूपात नाही. पुराणांचा उपयोग धार्मिक सांस्कृतिक कार्यासाठी व भारताचा सांस्कृतिक इतिहास मांडण्याचे काम पुराणांनी केले आहे. पुराणांच्या आधाराने इतिहास मांडणे सहज शक्य होते. आज बऱ्याच साहित्याचा मुलाधार पुराने आहेत हे विसरून चालणार नाही.
- **रामायणः-** रामायना बद्‌ल वाल्मिकीनी रामाच्या जन्माअगोदर हे काव्य लिहीले गेले व त्याप्रमाणे रामाचा अवतार झाला असे दोन मातप्रवाह आढलतात. रामाचे व्यक्तिमत्त्व एक आदर्श व्यक्तिमत्त्व मानले जाते. आदर्श मुलगा, आदर्श पती, आदर्श बंधू, आदर्श राजा, अशा वेगवेगळया पातळीवर रामाचे व्यक्तिमत्त्व काव्यरूपात मांडले आहे. रामाची पत्नी सीता ही देखील रामाच्या तोलामोलाची व आदर्श नारी म्हणून सितेकडे पाहिले जाते. रामायनात अनेक आदर्श असून त्याग, रक्षण, दृष्टप्रवृत्तीचा नाश इ. दिसुन येतात.
- **महाभारत :-** महाभारत हे व्यासानी लिहीले असून त्यात आर्याचा राजकिय आर्थिक इतिहास आहे. कौरव - पांडव या दोन शक्तीमधील संघर्ष महाभारतात पहावयास मिळतो यात अनेक व्यक्तिमत्त्व असून यूधिष्ठीर हा सदगूणांचा आदर्श सांगितला आहे. यात नैतिक-अनैतिक अनेक प्रश्न उद्‌भवतात युध्दशास्त्र-तंत्र यांच्या प्रगतीची अवस्था दिसून येते. यातील अस्थे युध्दभूमी युध्दाचे नियम, यासारख्या अणेकगोष्टी त्यात दिसुन येतात. महाभारत मराठी व अन्यभाषामध्ये लिहीन्यायी प्रेरणा आजही मिळते.
- **अर्थशास्त्र:-** चंद्रगूप्त मौर्य यांच्या दरबारातील विष्णुगुप्त (आर्य चाणक्य) यांनी अर्थशास्त्र हा ग्रंथ लिहिला असुन त्यात १५ प्रकरण असुन त्यात १८० च्या आसपास विषय हाताळले आहेत. यात राज्याचा सर्वांग सुंदर विचार या ग्रंथात मांडला आहे. राज्याच्या सप्तंगांची चर्चा केलेली असून हा ग्रंथ आर्थिक इतिहासाचा पायाभूत ग्रंथ मानावयास हवा.
- **हर्षचरितत्र:-** सम्राट वर्षवर्धन याच्या दरवारातील प्रसिध्द कवी बाणभट याने हा ग्रंथ लिहीला. यात सम्राहाबद्दल माहिती असुन मौखरी साम्राज्यावर शंशाकने हल्ला करून ते राज्य जिंकले आणि हर्षाने ते राज्य पुन्हा मिळिविले हा विद्य यात आहे. शंशांक-हर्ष यांच्या लढाईची माहिती यात मिळते.
- **विक्रमादेव चरितमः-** गुप्त घराण्यातील कर्तबगार सम्राट दुसरा चंद्रगुप्त विक्रममदित्य्य याचे हे चरित्र असुन बिल्हाणाने ते लिहिले आहे. त्यात विक्रमदित्याच्या अणेक लढायांची वर्णने आहेत. भारतीय इतिहास लेखानिक काव्य संदर्भातील दृष्टीकोन यातुन स्पष्ट होते.
- **राजतरंगिणी :-** कल्हण हा त्या ग्रंथाचा कर्ता असुन यात काश्मिरचा इतिहास सांगितला आहे. कल्हात्राणे नव्या तत्रांने हा इतिहास सांगितला आहे. यात कश्मिरमधील चालीरिती, परपंरा, रूढी यांचे वर्णन आहे. यात काटकोट, उत्सला या दोन घराण्यांचा इतिहास सांगितला आहे. आठव्या शतकातील लोहरा घराण्याचा इतिहास सांगितला आहे. यात वस्तूस्थितीचा आठावा व वर्णन घेतलेले आहे. तसेच राज्याची कर्तव्य देखील सांगण्यात आली आहे.

## ३) भारतीय प्राचीन कालाखंडात इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोण :-

पुराण, रामायण, महाभारत, उपनिषद, यातुन हिंदूचा दृष्टिकोन हा प्रायः अध्यात्यवादी आहे. कारण हे ग्रंथ ऋषी मुनींनी रचले आहेत. युध्दा पेक्षा शातंता समभाव विकास सद्भाव यात मानवी जिवणाचे कल्याण व्हावे हा प्रमुख उद्देश होता. यातील सर्वच लिखान आध्यत्मिक नसुन धार्मिक तात्विक लिखानातुन इतिहासबद्दलची दृष्टी दिसुन येते. भारतीयांना इतिहासबद्दल दृष्टिकोन हा वैहिक काळापासून दिसते. मानवी संबंध निसर्गाशी एकरूपता जीवनाचे तत्वज्ञान हेच अप्रत्यक्षपणे प्राचीन भारतीय इतिहासाचे तत्वज्ञान बनले.

## ४) मर्यादाः-

प्राचीन काळाचा इतिहास शास्त्रशुध्द लिहीला गेला नाही. कारण इतिहास किंवा घडलेल्या घटना लिहून ठेवाव्यात असे भारतीयांना कधी वाटले नाही. भारतीयांचा जीवणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अध्यात्मिक होता. यामुळे व्यावहारिक गोष्टींकडे भारतीयांनी गाभिरंपणे पाहिले नाही.

प्राचीन भारतीय इतिहासात गुंढगुजंन, परीकथा, देवांचे अवतारकार्य, अमानवी शक्ती यांचा प्रामुख्याने विचार केकायाचे दिसुन येते.

- भारतीय प्राचीन इतिहास लेखनास्त्राचा विचार न करत असतांना त्यातील अनेक महत्त्वपुर्ण माहिती आपण आजही साधण म्हणून वापरतो त्यामुळे याकाळात लिखणाची कला व त्यातुन निर्माण झालेले ग्रंथ व त्या ग्रथांच्या आजही आदर्श म्हणुन आपण बघतो.

- संदर्भः-


१) इतिहास तोंडओळख - डॉ. सरल धारणकर

२) इतिहास लेखनशास्त्र - डॉ. अ. रा. कुलकर्णी

३) इतिहास लेखनशास्त्र - प्रा. सुहास मधुकर राजदेरकर


*****